Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

**Rate Fixation of Duster**
**''डस्टर'' या बाबी करीता दरनिश्चिती**

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई - ४०० ०३२.**

**परिपत्रक क्रमांक भांखस/डस्टर/दर निश्चिती/(२१)/**

**२००८-२००९/बी –२७१५८ दिनांक:- ०७/०७/२००८**

**वाचा:- १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखसं/१०८८/२५१२/उ-६, दि. ०२/०१/१९९२.**

**२) शासन निर्णय क्र.भांखस-१०९४/(२७०२)/४०६५३/उद्योग-६,दिनांक २०/०५/१९९५.**

**३) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.भाखसं-२००६/(१६३)/ उद्योग-४, दिनांक ०२/०८/२००६**

**४) मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समिती निर्णय क्रमांक १३५, बैठक दिनांक १३/०६/२००८.**

**शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.भांखस/१०८८/२५१२/उ-६, दिनांक २ जानेवारी, १९९२** च्या परिशिष्ट- पाचमध्ये शासनाचे अंगीकृत व्यवसायांकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित केलेल्या विविध वस्तूंची यादी देण्यात आली आहे. याच शासन निर्णयातील परिच्छेद ७ नुसार संबंधित संस्थांकडून पुरवठा करण्यात येणा-या वस्तूंची किंमत ठरविण्याचे अधिकार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या, भांडार खरेदी समितीकडे सोपविण्यात आले आहेत. तसेच १) **मे. मनचरजी नवरोजी बाणाजी इंडस्ट्रीज होम फॉर दि ब्लाईड, जोगेश्वरी, मुंबई-१०२ यांना शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.भांखस/१०८८/२५१२/उ-६, दि.०२/०१/१९९२ अन्वये, २) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई-४०० ००१ यांना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस-१०९४/(२७०२)/४०६५३/उद्योग-६, दि. २०/०५/१९९५ अन्वये व ३) मे. दि एन. एस. डी. इंडस्ट्रियल होम फॉर दि ब्लाईंड, बी. डी. डी. चाळ ब्लॉक नं. ५२, वरळी, मुंबई-४०० ०१८ यांना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग पुरक शासन निर्णय क्र. भांखस-२००६/(१६३)/ उद्योग-४, दि.०२/०८/२००६ अन्वये ''डस्टर''** या बाबीचे आरक्षण देण्यांत आले आहे.

**भांडार खरेदी समिती निर्णय :- मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने त्यांच्या दिनांक १३/०६/२००८ रोजी झालेल्या बैठकीत खालील दर्शविलेल्या तक्त्यात दरनिश्चिती महामंडळ/संस्थाना करण्यांत आलेली आहे.**

**''डस्टर''** ही बाब **१)** मे. मनचरजी नवरोजी बाणाजी इंडस्ट्रीज होम फॉर दि ब्लाईड, जोगेश्वरी, मुंबई,-१०२, २) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई -४०० ००१ व ३) मे. दि एन. एस. डी. इंडस्ट्रियल होम फॉर दि ब्लाईंड, बी. डी. डी. चाळ ब्लॉक नं. ५२, वरळी, मुंबई-१८ यांचेकरिता राखीव असल्याने त्यांचेकडून खरेदी करण्यांत यावी.

Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

**...ठी ''डस्टर'' चे निश्चित केलेले दर**

| | |
|---|---|
| | **...ी x ७५ सें.मी** |
| | **...ा नग** |
| **...** | **...२/२० कॉटन (६० ग्रॅम) उभे धागे- ३६ प्रती इंच**<br>**वेप्ट ६ इंच (६५ ग्रॅम) आडवे धागे- २४ प्रती इंच**<br>**धागा ४ मी. (६० नंबर)** |
| **निश्चित केलेले दर** | **प्रति नग दर रुपये ३१.६० फ्रि डिलीव्हरी फॉर मुंबई.**<br>**प्रति नग दर रुपये ३३.०० एफ.ओ.आर. डेस्टीनेशन मुंबई बाहेर सर्व महाराष्ट्र** |

**शासनाचे अंगीकृत महामंडळ/मंडळ यांनी त्यांचेकडे नोंदणीकृत उत्पादक संस्था/सभासद व मंडळांची/महामंडळानी स्वत:च उत्पादन केलेल्या वस्तूंचे शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा व महामंडळांनी ''बाजारातून वस्तू विकत घेवून शासनास पुरवठा करु नये.''**

**अंध व अपंग यांची धर्मादाय संस्था यांनी अंध व अपंग व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयांनी दिलेले काम पूर्ण करुन घ्यावे.**

**वरील दर हे एफ.ओ.आर. डेस्टिनेशन सर्व कर समाविष्टीत असे राहतील. वरील दर हे दि.३०/०६/२००९ पर्यंत ग्राहय राहतील.**

**पुरवठा कालावधी:-** मागणीपत्र मिळाल्यापासून ६ आठवडयाच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकाराला माल प्राप्त झाल्यानंतर **९०%** टक्के रक्कम २ आठवडयामध्ये द्यावयाची आहे व उर्वरित **१०%** टक्के रक्कम सर्व मालाची मागणीकाराला पोच सुस्थितीत व विनिर्देश प्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसापर्यंत करणे आवश्यक आहे. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ½ % टक्के प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकारामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

(अ) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या १० % दंड

(ब) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड

सदरील दंडाची वसूली करण्यांची संपूर्ण जबाबदारी मागणीकाराची असेल.



**(बी. व्ही. राठोड)**
**उद्योग सह संचालक ( भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरिता.**

प्रति :-

१) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

२) मे. मनचरजी नवरोजी बाणाजी इंडस्ट्रीयल होम फॉर दि ब्लाईड, (**Chateau DIAEU**), २८०, एस. व्ही. रोड, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई- ४०० १०२.

३) मे. दि एन. एस. डी. इंडस्ट्रियल होम फॉर दि ब्लाईंड, बी. डी. डी. चाळ ब्लॉक नं. ५२, वरळी, मुंबई-४०० ०१८